बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १४७ वा । सोमवार दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### जिल्ह्यात विविध ठिकाणी अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्ह्यात विविध ठिकाणी अवैध मद्य विरोधी कारवाई केली असून पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत संगीता रा. गावसुद ता.जि. धाराशिव या दि.१५.०८.२०२५ रोजी गावसुद पारधी वस्ती येथे अंदाजे २४,१०० किंमतीची ५० लिटर गावठी दारु व ४०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

भुम पोलीस ठाणे अंतर्गत दत्तात्रय रा. समर्थ नगर भुम ता.भुम जि. धाराशिव हे दि.१५.०८.२०२५ रोजी ०८.५५ वा. सु दत्ता गवळी यांचे हॉटेल समोर रोडलगत भुम येथे अंदाजे ४०० किंमतीच्या ५ देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत सुरेखा रा. सांगवीकाटी ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.१५.०८.२०२५ रोजी आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे ८०० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

ढोकी पोलीस ठाणे: अंतर्गत दुलाबाई रा. रुई ढोकी ता. जि. धाराशिव या दि.१५.०८.२०२५ रोजी १८.२५ वा. सु आपल्या राहत्या घराचे समोर अंदाजे १,२०० किंमतीची १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

धाराशिव शहर पोलीस ठाण अंतर्गत नितीन रा. भारत टाकीजवळ झोरी गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.१५.०८.२०२५ रोजी १९.५० वा. सु आठवडी बाजार परिसरातील सिटी हॉटेलच्या पाठीमागे मोकळ्या जागेत अंदाजे १,८८० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ४७ सिलबंद बॉटल अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. या सर्व प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा – खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



वाशी (प्रतिनिधी) - वाशी तालुक्यातील वाशी शहर, घोडकी, घाटपिंपरी तसेच फाकराबाद परिसर गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थितीचा सामना करत आहे. घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून रस्ते, वीजपुरवठा व वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे.

शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची जनावरे पुरात वाहून गेले असून अनेक ठिकाणी घराची पडझड झाली आहे. या परिस्थितीची आज खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन जिल्हाधिकाऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करणेबाबत पत्राव्दारे आदेशीत केले.

यावेळी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करून मदत व नुकसानभरपाईची कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रभावित नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.

आपत्तीच्या या काळात सर्वांनी एकमेकांना सहकार्य करावे, संयम ठेवावा व सुरक्षित ठिकाणी राहावे, असे आवाहन करण्यात आले. पाहणीदरम्यान जिल्हाप्रमुख रणजित पाटील, तालुकाप्रमुख तात्या गायकवाड, तहसीलदार म्हेत्रे साहेब, युवासेना तालुकाप्रमुख गणेश भराटे, शहरप्रमुख अनिल गवारे आदी मान्यवर उपस्थित होते.

## माजी सैनिकांना मिळणार नि:शुल्क शेळीपालन प्रशिक्षण

धाराशिव दि.१५ ऑगस्ट (जिमाका) जिल्हा उद्योग केद्र धाराशिव व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रमातंर्गत जिल्हयातील माजी सैनीकांसाठी शेळी पालनाबाबत निशुल्क प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्हा उद्योग केंद्र धाराशिव व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील माजी सैनिक,माजी सैनिकांची पत्नी / वीरनारी /विधवा पत्नी तथा पाल्य यांच्या कल्याणार्थ शेळी पालनाबाबत १२-१५ दिवस कालावधीचे प्रशिक्षण देणेसाठी शासनाने सूचित केले आहे व ईच्छुक माजी सैनिक,माजी सैनिकांची पत्नी / वीरनारी/विधवा पत्नी तथा पाल्य यांची नावे सादर करणेबाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने जिल्हयातील ईच्छुक माजी सैनिक,माजी सैनिकांची पत्नी / वीरनारी / विधवा पत्नी/ पाल्य यांनी त्यांची नावे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय धाराशीव येथे (दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७/७५८८५२७५५४) संपर्क साधून तत्काळ कळवावी. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

## पवनचक्की व्यवहाराबाबत पालकमंत्र्यांचे स्पष्ट निर्देश: शेतकऱ्यांच्या हितासाठी कागदपत्रांची पूर्ण नोंदणी अनिवार्य




धाराशिव, (जिमाका) :- जिल्ह्यात सुरू असलेल्या पवनचक्की प्रकल्पांच्या संदर्भात शेतकरी आणि कंपन्यांमध्ये अनेकदा तणावाची परिस्थिती निर्माण होत असल्याचे दिसून आले आहे.या पार्श्वभूमीवर पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांनी प्रशासनाला ठोस निर्देश देत शेतकऱ्यांच्या हितासाठी कडक भूमिका घेतली.शेतकऱ्यांच्या सर्व कागदपत्रांची नोंदणी पूर्ण होईपर्यंत कोणताही पुढील व्यवहार करण्यात येऊ नये, असे आदेश पालकमंत्र्यांनी यावेळी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित आजच्या या बैठकीला खासदार ओमप्रकाश माजी आमदार जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,पोलीस अधीक्षक शफकत आमना,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव व उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, पवनचक्की कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच संबंधित शेतकरी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.सरनाईक म्हणाले की, गेल्या काही काळात पवनचक्की प्रकल्पासाठी जमिनीचे व्यवहार करताना शेतकऱ्यांना योग्य माहिती न देणे, करारपत्रांमध्ये त्रुटी ठेवणे किंवा अटी अस्पष्ट ठेवणे अशा अनेक तक्रारी पुढे आल्या होत्या.यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत झाला असून,त्यांना आर्थिक नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की,शेतकरी हा या व्यवहारातील मुख्य घटक आहे.त्याला फसवले जाऊ नये याची हमी प्रशासनाने घ्यावी.पवनचक्की कंपनी आणि शेतकरी यांच्यामध्ये समन्वय राखणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य आहे.

जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली यासाठी विशेष समिती नेमण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. ही समिती शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची तपासणी,नोंदणी प्रक्रिया तसेच पवनचक्की कंपन्याकडून होणाऱ्या पुढील व्यवहारांचे नियमन करेल.कोणताही करार पारदर्शक पद्धतीने झाला पाहिजे आणि शेतकऱ्यांचे सर्व हक्क सुरक्षित राहिले पाहिजेत,अशी अट घालण्यात आली आहे.

पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी पुढे सांगितले की,जिल्ह्यातील विकासकामांसाठी गुंतवणूक होणे महत्त्वाचे आहे,मात्र त्यासाठी शेतकऱ्यांचे हक्क गमावले जाऊ नयेत. पवनचक्की प्रकल्पांमुळे रोजगारनिर्मिती आणि वीज उत्पादनाला चालना मिळणार असली,तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांनाही मिळाला पाहिजे.

बैठकीत अनेक शेतकऱ्यांनी आपली बाजू मांडली.काहींनी सांगितले की,त्यांना योग्य मोबदला मिळाला नाही,तर काहींनी करारातील अटींचे स्पष्टीकरण न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.या सर्व तक्रारी गांभीर्याने घेत पालकमंत्र्यांनी प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

## स्वातंत्र्य दिनी उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी-कर्मचारी व विद्यार्थी सन्मानित



धाराशिव (जिमाका)-७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन जिल्ह्यात आज उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.यावेळी विविध विभागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी,कर्मचारी तसेच शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह,प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाला स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर,खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील,आमदार कैलास घाडगे,माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,पोलिस अधिक्षक शफकत आमना,अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, जि.प.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी अुनप शेंगुलवार,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

२९ सप्टेंबर २०२० रोजी चकमकीत शहीद झालेल्या झालेले नायक वामन मोहन पवार यांच्या वीर पत्नी श्रीमती वैशाली वामन पवार यांना ताम्रपट देवून सन्मानित करण्यात आले.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांच्या विशेष म्हणून दुसरा टप्पा निवड झालेल्या कार्यालयांना मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याकडून प्राप्त प्रशस्तीपत्र यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते कार्यालय प्रमुखांना प्रदान करण्यात आले.

हरित धाराशिव अभियान २०२५ अंतर्गत दुरुस्त कामगिरी केलेल्या विभागांना सन्मानित करण्यात आले.हरित धाराशिव अभियान २०२५ अंतर्गत एकाच दिवशी १५ लक्ष वृक्ष लागवड करून वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड संस्थेमध्ये संस्थेने कन्फर्मेशन प्रमाणपत्र देऊन गौरव केल्याबद्दल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीण धरमकर, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी विश्वास करे व जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता विजय थोरात यांचा सन्मान करण्यात आला.हरित धाराशिव अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या नगर पालिका व ग्रामपंचायतींचाही सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामध्ये मराठवाड्यातील सर्व विभागातील २५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये विनाअपघात सेवा केलेल्या चालकांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.पूर्व उच्च माध्यमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता परीक्षा पुरस्कार राज्यस्तरीय गुणवत्ता यादी स्थान मिळाल्याबद्दल,स्पेलिंग बी उपक्रमातील विद्यार्थ्यांना, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हयातील अवयवदात्यांच्या नातेवाईकांचा,जिल्हा परिषद पंचायत विभागातंर्गत येत असलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकाऱ्यांचा,कृषी विभागातील कर्मचाऱ्यांचा,पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही पालकमंत्री श्री.सरनाईक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामकाजाचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा




धाराशिव (जिमाका) -पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी रात्री धाराशीवच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला.यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक शफकत आमना, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेश चौहान,आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गंगासागरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

श्री.सरनाईक यावेळी म्हणाले की, हॉस्पिटल परिसरात पोलीस चौकी आणि सुरक्षारक्षक असताना या परिसरात हल्ल्याच्या घटना वारंवार घडत आहे,ही अत्यंत गंभीर बाब आहे.तातडीने याबाबतची दखल घेऊन सुरक्षाविषयक सुधारणा पोलीस विभाग आणि हॉस्पिटल प्रशासनाने कराव्यात. अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. पोलिसांच्या सुरक्षा चौकीचा वचक हॉस्पिटल परिसरात वावरणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर असला पाहिजे. गुंड प्रवृत्तीचे लोक हॉस्पिटल परिसरात दिसू नये.अशा प्रवृत्तीचा बंदोबस्त करून त्यांच्यावर तातडीने गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी,असे त्यांनी सांगितले.

यावेळी शासकीय महाविद्यालयाचा नवीन इमारतीसाठी लागणारी जागा व त्यासाठी उपलब्ध निधीची माहिती अधिष्ठाता श्री. चौहान यांनी दिली.

शासकीय महाविद्यालयाकडून १०० दिवसाच्या कामकाजाचा आढावा यावेळी श्री.सरनाईक यांनी घेतला. महाविद्यालयाच्या सादरीकरणातून हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात १४ बेडची व्यवस्था,रेफर टू सोलापूरचे प्रमाण कमी झाले, एका वर्षात मृत्यूदरास ५० टक्के घट झाली आहे.रक्त साठवणुकीची वेगळी व्यवस्था,महात्मा फुले जन आरोग्य योजना,वैद्यकीय महाविद्यालयाचा नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेची झालेला करार याबाबतची माहिती यावेळी दिली.

तसेच कठीण व जोखमीच्या शस्त्रक्रिया,मणक्याची शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी,पोलिओ मेक्सिलरी सर्जरी,लेप्रोस्कोपी गायनॅकॉलॉजी सर्जरी करण्यात येत असल्याचे सांगून अवयवदान दिनानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.या आढावा बैठकीला वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग,कर्मचारी तसेच जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

ओऽम् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## नियोजन करावेच लागेल

देशात तसे पाहिले तर अनेक बाबतीत नियोजन नाही. नियोजनाचा अभाव असल्याने अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे सर्वात महत्वाचे नियोजन आहे. शहरी भागातील श्वानाचा प्रश्न असो की, सद्या गाजत असलेल्या कबुतराचा प्रश्न आहे. ज्यावेळी समस्या सतावते त्यावेळी मात्र नियोजनाकडे वळले जातो. समस्याच निर्माण होवु नये असे वाटत असेल तर सुरवातीपासून नियोजन केले पाहिजे. आपल्या राज्यात पाणी प्रश्न हा उन्हाळ्यात निर्माण होतो. चांगला पाऊस झाला तरी पाणीसमस्या कायम दिसून येते. त्यामुळे सर्वात महत्वाचे नियोजन असते. शेतकरी सुद्धा पुढील वर्षी बियाणे वापरता यावेत म्हणून ते व्यवस्थित मातीच्या भांड्यात ठेवतात. तसे कबुतराचा त्रास आतच मुंबईकरांना होत असल्याने राज्यात विविध बातम्या पसरविल्या जात आहेत. काही प्राणीमित्र यांना बंदोबस्त करण्याचा विरोध आहे. तर काही पर्याय सुचवित आहेत. त्यामुळे काही बाबीचा विचार केला पाहिजे. राज्यात बेरोजगारीचा प्रश्न वाढता आहे. सतत सतावत आहे. यावर उपाय म्हणावे तसा केला जात नाही. उपयोजना केल्यास यावर मात करता येते. सर्वजन सरकारी नोकरीच्या मागे धावत आहेत. शिपाईची नोकरी मिळाली तरी समाधान मानणारे आहेत. मुळात सरकारी नोकरी पेक्षा आपला उद्योग चांगला हे केंव्हा लक्षात येणार. मुळात आपल्याकडील शिक्षण हे नोकरीसाठीच दिले जाते. आपला स्वंतत्र व्यवसायाबाबत विचार केला जात नाही. गाव तेथे ठराविक गरज सतत दिसून येते. जसे किराणा दुकान, पिठाची चक्की, शेतीला लागणाऱ्या बाबी आदि दररोजच्या जीवनात आवश्यक बाबी लागतात. पालाभाजी, सकाळी दुध-पाव विक्रीचा व्यवसाय दिसून येतो. आलिकडे मुले लाजतात. मुळात लहान धंद्यात जेवढी कमाई आहे. विश्रांती आहे व समाधान आहे तेवढे मोठ्या उद्योगात नाही. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. शेतकऱ्याच्या मुलाने शेती करण्यात लाजणे योग्य नाही. आपला व्यवसाय करण्यात कसली लाज? त्यामुळे आपल्या घरात कोणताही उद्योग-व्यवसाय असेल तो केला पाहिजे. यात लाज वाटण्यासारखे काहीच नाही. कारण उद्योग-धंदा करणे हा स्वाभिमानाची बाब आहे. कोणाच्या हाताखाली काम करण्यापेक्षा आपला लहान-मोठा व्यवसाय कधीही एकत नाही. एकतर आपल्याकडे आपले शिक्षण हे ज्ञानासाठी व सरकारी मिळविण्यासाठी आहे. शिक्षण आता भावी पिढी आपल्या पायावर कशाप्रकारे उभा राहिल याचे ज्ञान दिले पाहिजे. जपान किंवा जर्मन मध्ये लहानापासून मोठ्या पर्यंत कामात व्यस्त राहातात. इतर देशात एक बाब प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे देशातील नागरिकांना कोणताही खर्च नाही. राशन मोफत मिळते. त्याबरोबर सर्वांना आरोग्य सुविधा व शिक्षण विनामुल्य आहे. भारतात मात्र सर्वाधिक पैसा आरोग्य व शिक्षणावर खर्च होतो. त्यामुळे पैसे साठविण्याची चढाओढ भारतात दिसून येते. त्यामुळे भ्रष्टचार बोकाळला जातो आहे. पैशाची गरज भासत नसल्यास त्याची साठवणुक होत नाही. एकवेळा तर चीनमध्ये मंदी आली. त्यावेळी चीन सरकारने तर बाजारात खरेदी करावी यासाठी सुट्टी दिली जाहिर केली होती. चीन नागरिकांनी बाजारातून खरेदी करावे हा उद्देश होता. सतत कामात व्यग्र असणारे नागरिक काही देशात सापडतात. जपान, जर्मनमधील नागरिक सतत कामात असल्याने इतर काही बाबी उद्भवत नाहीत. रिकामे कोणी सापडत नाहीत, त्यामुळे बंद पुकारणे, मोर्चे व आंदोलनास थाराच दिसून येत नाही. सतत कामात असल्याचा मोठा फायदा होतो ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. भारतातील व इतर देशातील तुलनात्मक परिस्थितीचा विचार केला तर आपण खुप मागे आहोत असे दिसून येते. विकासाच्या बाबतीत तर दूर आहोत. एकदा विकासाची कामे केली तर ती कायम असतात. भारतात एक वर्षात रस्ता उखडला जातो. पाणीपुरवठा योजना दुसऱ्यावर्षी तयार करावी लागते. कामय स्वरूपी केवळ देशात रस्ते दिसून येत आहेत. त्यात ही खड्डे पडत असल्याचे दिसून येत आहे. इतर देश जे विकासाबाबत पुढे आहेत व आपला देश यात तुलनात्मक विचार केला पाहिजे. भारतात असे काही नागरिक सापडतील की, ज्यांच्याकडे आरबो-खरबो पैसा आहे. अफाट संपत्तीचे नागरिक सापडतील. तसे परदेशात नाही. मुळात पैसा लागतोच कशाला? शिक्षण व आरोग्य याला! तेच सरकारने मोफत केले तर भ्रष्टाचार कमी होईल. सर्वांनाचा मोफत धान्य दिले पाहिजे. शेती हा व्यवसाय कृषी विभागकडून मोफत नांगरणी, पेरणी केली तर कर्जदेण्याची किंवा कर्ज माफीची गरज नाही. जनतेला आळशी बनविले जात आहे हेच घातक ठरत आहे. जनतेला कामाची सवय लागली पाहिजे. चांगली सवय असेल तरच समाधानकारक बनते. केवळ आपणच आपल्या नागरिकांना लुटण्याचे काम थांबविले पाहिजे. भारतात ठराविक, म्हणजे बोटावर मोजण्याईतकी मंडळीकडे अधिक धन आहे. ते धन एवढे आहे की याला गणता नाही. मुळात एका कुटुंबियांना किती गरज आहे. कशाची गरज आहे. याचा विचार राज्यकर्त्यांनी केला पाहिजे. विकास साधण्याच्या नावाखाली भ्रष्टाचार होत असेल तर ते योग्य नाही. मुळात भ्रष्टाचार का होतो किंवा यामागील कारणाचा शोध घेतला पाहिजे. कोणीही कितीही संपत्ती जमा करावयाची हे सुत्र योग्य नाही. आज चीन का पुढे आहे. जे जगात उत्पादीत होत नाही त्याचे उत्पादन केले जाते. जगात चीनचा माल वितरीत होतो. महिला ह्या बसून खात नाहीत तर त्यांच्या शरिराला झेपेल तेवढे काम करतात. पोष्ट ऑफीस व बँकेत दिसून येतात. पुरूष मंडळी ही आवजड कामे करताना दिसतात. मुले सुद्धा काम करीत असतात. त्यामुळे चीन हा पुढे आहे. अनेक अल्पदरात वस्तू बनवुन जगाच बाजारपेठ निर्माण केले आहे. तसे भारताने आता विचारकरून नियोजन करण्याची गरज आहे. भारतातील लोक कष्ठकरी आहेत. संघर्षमय जीवनाचे आहेत, केवळ नियोजनाचा अभावामुळे भारतीय मागे आहेत. त्यामुळे सर्वात महत्वाचे नियोजन आहे ते सर्व बाबीचे केले पाहिजे.

# ग्रंथपाल हा ज्ञान आणि वाचन संस्कृतीचा प्रसारक; श्री सचिन चाफेकर यांचे मत

## एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** ग्रंथपालाची भूमिका केवळ पुस्तके जतन करणे नाही तर लोकांना उपलब्ध माहितीशी जोडणे, शैक्षणीक मार्गदर्शन करणे, ज्ञानाचे संवर्धन करुन ते सर्वांना उपलब्ध होईल याची व्यवस्था करण्याचे आहे. ग्रंथपाल हा फक्त पुस्तकाचा रक्षक नसून तो ज्ञानाचा पूल बांधणारा आणि वाचन संस्कृतीचा प्रसारक आहे, असे मत एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री सचिन चाफकर यांनी व्यक्त केले.



येथील माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने भारताचे पहिले ग्रंथपाल डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल श्री सचिन चाफेकर बोलत होते. यावेळी ग्रंथालय समिती अध्यक्ष डॉ. महेश दडपे, माजी अध्यक्ष डॉ. ओम बघेले, ग्रंथालय समितीचे सचिव तथा मुख्य ग्रंथपाल ज्ञानोबा केंद्रे, ग्रंथपाल बलभीम ठाकुर, सौ. अनिता कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शियाली राममृता रंगनाथन हे एक दूरदर्शी, विद्वान आणि भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक म्हणून ओळखले जातात. डॉ. रंगनाथन हे केवळ ग्रंथपाल नव्हते. ते एक अग्रणी होते. ज्यांनी ग्रंथालयांची संकल्पना केवळ पुस्तकांच्या भांडारातून ज्ञानाच्या चैतन्यशील केंद्रांमध्ये रुपांतरित केली असे सांगून यावेळी पुढे बोलताना श्री सचिन चाफेकर म्हणाले की, पुस्तके वापरासाठी आहेत, प्रत्येक वाचकास त्याचे पुस्तक, प्रत्येक ग्रंथासाठी वाचक, वाचकाचा वेळ वाचवा व ग्रंथालय ही एक वाढणारी संस्था आहे हे डॉ. रंगनाथन यांचे ग्रंथालय विज्ञानाचे पाच नियम सांगून ते कालातीत तत्व आहेत जे जगभरातील ग्रंथपाल आणि माहिती व्यावसायिकांना मार्गदर्शन करत राहतात. त्याचबरोबर डॉ. रंगनाथन यांनी कोलन वर्गीकरण प्रणालीची ओळख करुन दिली, भारतातील ग्रंथालय कायद्याचा पाया घातला आणि पुढील पिढ्यांना, ग्रंथालयांना समाज, शिक्षण आणि संस्कृतीची सेवा म्हणून पाहण्याची प्रेरणा दिली.

सध्याच्या डिजिटल युगात, जिथे माहिती मुबलक आहे परंतु अनेकदा विखुरलेली आहे, ग्रंथपालाची भूमिका आणखी महत्त्वाची आहे. आपण माहितीच्या महासागरात नेव्हिगेटर आहोत - योग्य माहिती योग्य वेळी योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचेल याची खात्री करावी. आपण डॉ. रंगनाथन यांच्या दृष्टिकोनातून प्रेरणा घेऊया आणि समावेशक, नाविन्यपूर्ण आणि प्रभावी ग्रंथालये बांधण्यासाठी काम करण्याबाबत त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अश्वस्त केले.

यावेळी बोलताना डॉ. ओम बघेले म्हणाले की, डिजिटल स्वरुपातील माहितीपेक्षा पुस्तक वाचनातील माहिती अधिक स्मरणात राहाते व या माहितीचा पुढील काळात उपयोग होऊ शकते असे त्यांनी सांगितले.

यावेळी शिक्षक वृंदातून डॉ. विजयालक्ष्मी सुलतानपुरी व डॉ. अतुफा बक्श तर विद्यार्थ्यांतून पदव्युत्तर विभागातून डॉ. सानिका मेंडकी व पदवी विभागातून बी.डी.एस. तृतीय वर्षाची विद्यार्थीनी सना शेख यांना सर्वोत्तम वाचक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री ज्ञानोबा केंद्रे यांनी केले. सूत्रसंचालन मृणाल कुलकर्णी यांनी केले तर आभार सहाय्यक ग्रंथपाल सौ. गंगासागर गित्ते यांनी केले. या कार्यक्रमासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील शिक्षक, डॉक्टर व विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनो, कौशल्ये विकसित करा : सीएमए अभिजीत सेनगुप्ता

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** सध्याच्या स्पर्धेच्या जगात कौशल्ये विकसित केल्याशिवाय करिअरच्या संधी उपलब्ध होणार नाहीत. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्यावर मार्गक्रमण करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण घेत असताना आपण कौशल्ये विकसित करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या व्ही स्मार्ट अकॅडमिचे संचालक सीएमए अभिजीत सेनगुप्ता यांनी येथे बोलताना केले.

दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या कॉम्पिटिटिव्ह सेल आणि पुण्याच्या व्ही अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने सीए फॉर बिगीनर्स : नो द रोड अहेड या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. तर मंचावर दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष संजय बोरा, उपप्रचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा आष्टेकर, आयोजिका डॉ. रूपा गिल्डा, प्रा. ऋतुजा देशमुख आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अभिजीत सेनगुप्ता म्हणाले, आपल्याला भविष्यात काय करायचे आहे हे आताच ठरवून त्या पद्धतीने मार्गक्रमण करणे आवश्यक आहे. वाणिज्य क्षेत्रात अनेक करिअरच्या संधी आहेत, त्या संधी विद्यार्थ्यांनी शोधायला हवे. सीए ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मनात इच्छा असायला हवी. कुठलीही परीक्षा अवघड नसते, त्यासाठी जिद्द आणि मेहनत असावी. यावेळी बोलताना संजय बोरा म्हणाले, आज देशाला कुशल कामगारांची गरज आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्ये विकसित करावीत. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर म्हणाले, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने अनेक चार्टर्ड अकाउंटंट्स घडविले आहेत. सध्याच्या नव्या युगात करिअर करताना काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांनी पुढे यावेळी, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश शर्मा यांनी तर शेवटी आभार प्रा. अजय चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त लातूर जिल्हा बँकेत चेअरमन धीरज देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण



**लातूर/प्रतिनिधी :** देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात टिळक नगर येथे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव संचालक पृथ्वीराज शिरसाठ संचालक राजकुमार पाटील संचालक अनुप शेळके ,माजी संचालक संभाजी सुळ, बँकेचे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उपस्थित अतिथी गन अधिकारी कर्मचारी यांना बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.

# महावितरणकडून विद्युत सहायकांची परिमंडलनिहाय निवड यादी जाहीर

## कागदपत्रांची पडताळणी दि. २० ते २२ ऑगस्टला

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची व संबंधित परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात येणार आहे. या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर नमूद परिमंडल कार्यालयांमध्ये मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे तसेच अद्ययावत ओळखपत्राच्या मूळ प्रतीसह स्वतः हजर राहणे अनिवार्य आहे. महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक या पदासाठी दि. २० ते २२ मे दरम्यान ऑनलाइन क्षमता चाचणी घेतली होती. यात निवड झालेल्या उमेदवारांची यादी दि. ३० जुलैला सविस्तर माहिती व सूचनेसह कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर दि. १४ ऑगस्टला निवड यादीतील उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली आहे. आता येत्या दि. २० ते २२ ऑगस्ट दरम्यान विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे. या तीनही दिवशी संबंधित परिमंडलांमध्ये सकाळी १० वाजता मूळ कागदपत्रांची पडताळणी सुरू होईल. नमूद दिवशी काही कारणास्तव पडताळणी पूर्ण झाली नाहीतर दुसऱ्या दिवशी करण्यात येईल. तथापि, सर्व मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह संबंधित उमेदवारांनी स्वतः हजर राहणे आवश्यक आहे. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहणार नाही त्यांची निवड रद्द समजली जाईल व भविष्यात त्यांच्या कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्युत सहायक पदी निवड झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील त्यांच्या नियुक्तीबाबत संबंधित परिमंडलामध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची सर्व माहिती महावितरणच्या www. mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# नाईक विद्यालयात पार पडला ध्वजारोहण व एस. एस. सी. माध्यमिक शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम

**नळेगाव/अजगर मजकुरी :** येथील अनंत तुळजाराम नाईक विद्यालयाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यालयात ध्वजारोहण व एस.एस.सी. माध्यमिक शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा अतिशय आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणात पार पडला या वेळी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यात पाटील डी के सर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या ''गाडीवाल्या गाडी हाक रं'' व ''सोन्याचं बाशिंग लगीन देवाचं लागतं'' या गाण्यावरील नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली व उपस्थित मान्यवरांकडून बक्षीस मिळवले.







तदनंतर विद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा घेण्यात आला. त्यात विद्यालयातून १०० पैकी १०० % गुण घेऊन प्रथम आलेली विद्यार्थिनी कु. श्रेया पप्पू सूर्यवंशी (विज्ञान१०० पैकी १०० गुण) हिचा संस्थेचे सचिव डॉ. माणिकरावजी पाटील साहेब यांच्या वतीने ५ ग्राम सोन्याची अंगठी घालून पालकासहित सुवर्ण सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर हुडगे कोचिंग क्लासेस चे सन्माननीय शिक्षक श्री.प्रा. दत्ता अप्पाराव हुडगे सर यांनी २.५ ग्रॅम सोन्याची अंगठी देवून सत्कार करण्यात आला. ही विद्यार्थिनी इतर सर्व प्रथम क्रमांकाच्या बक्षिसाची मानकरी ठरली या विद्यार्थिनीला विद्यालयातून एकूण १,११,००० रुपयाची पारितोषिके व स्मृतिचिन्ह देण्यात आली.

विद्यालयातून द्वितीय आलेली विद्यार्थिनी कू. गौरी अनिल देवशटवार हिला ४१२१ रुपयाची द्वितीय क्रमांकाची बक्षिसे व स्मृतिचिन्ह देण्यात आली.

विद्यालयातून संयुक्तरित्या तृतीय आलेले विद्यार्थी कु.आकाश गोविंद सूर्यवंशी व कु. उद्धव बालाजी चोंडे यांना तृतीय क्रमांकाची ३७१६ रुपयांची बक्षीसे व स्मृतिचिन्ह देण्यात आले मराठी विषयात प्रथम आलेली विद्यार्थिनी कु. आश्लेषा नरसिंग पाटील हिचाही सत्कार करण्यात आला


विविध विषयात प्रथम येणाऱ्या व वर्षभरात विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना ही बक्षीस वितरीत करण्यात आले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक व गावातील नागरिक व माजी विद्यार्थी यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री डॉ माणिकरावजी पाटील साहेब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री माधवरावजी पाटील साहेब यांनी स्थान भूषवले या प्रसंगी नवनीत शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सन्माननीय पदाधिकारी डॉ. माणिकरावजी पाटील साहेब, संस्थेचे अध्यक्ष माधवरावजी पाटील साहेब, संस्थेचे उपाध्यक्ष सूर्यकांतजी रेड्डी सर, सहसचिव जीवनराव बिराजदार गुरुजी व संस्थेचे इतर सर्व सन्माननीय सदस्य उमाकांतजी देवशटवार, अमर भैया पाटील, डॉ. प्रशांत शिरुरे, अभिजीत भैय्या पाटील, कैलास भैय्या रेड्डी अनंत तुळजाराम नाईक विद्यालयाचे मु. अ. श्री जीवन रेड्डी सर, त्रिवेनीबाई पाटील माध्यमिक विद्यालयाचे मु.अ. श्री संजय सगर सर व्यासपीठावर उपस्थित होते विद्यालयाचे माजी मु. अ. श्री काळे सर तसेच माजी सहशिक्षक श्री पतंगे सर व श्री जोशी सर श्री. सोमनाथ काका हे आवर्जून उपस्थित राहिले तसेच गावातील सर्व पत्रकार बंधू श्री अशोक बिराजदार व संजीव पाटील हे ही उपस्थित होते.

कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन सहशिक्षक श्री राहुल काळे सर यांनी केले तर आभार श्री राहुल शेटे सर यांनी मांडले कार्यक्रमाची सांगता शेवटी पसायदानाने करण्यात आली.

# एक होता साधू आणि सरपंच



कथा : रमेश तांबे

एका गावात एक साधू राहायचा. गावातल्या एका देवळात तो विशिष्ट वेळी बसलेला असायचा. तेजःपूंज चेहरा, पांढरी शुभ्र लांबलचक दाढी, मानेपर्यंत रुळणारे केस, पाणीदार डोळे, बघताक्षणी त्याच्यावर कोणाचाही विश्वास बसावा असे व्यक्तिमत्त्व आणि ओघवती गोड वाणी! त्यामुळे गावातली अनेक मंडळी त्याच्याकडे जायची. महाराजांना आपली सुखदुःख सांगायची. मग साधू महाराजदेखील डोक्यावर हात ठेवून, हवेतून अंगारा-धुपारा काढून, कधी पाठीवर हात फिरवून, लिंबातून लाल पाणी काढून आपल्या भक्तांना प्रभावित करत. लोक खूश होऊन महाराज सांगतील तेवढे पैसे त्यांच्या थाळीत टाकत. मग महाराजदेखील हळूच थाळीतल्या नोटा खिशात कोंबत. असा अनेक वर्षे महाराजांचा सत्संग सुरू होता.

अशा या आपल्या स्वतःच्या गावात विशाल आपल्या मित्रांसह भटकंती करण्यासाठी आला होता. दोन-चार मोठे वाडे आणि दोन नव्या कोऱ्या इमारती सोडल्या तर सारे गाव तसे साधेच वाटत होते. मातीच्या भिंती असलेली छोटी-छोटी कौलारू घरे होती. साऱ्या गावात एक प्रकारची गरिबी दिसत होती. विशालला या गोष्टीचे खूप नवल वाटले. एवढी सुपीक जमीन, बारा महिने वाहणारी नदी असे असताना गावात गरिबी का? विशालची चौकस बुद्धी त्याला स्वस्थ बसू देत नव्हती.

तो मित्रांसह तसाच माघारी फिरला. मग थेट सरपंचांच्या घरी गेला अन् म्हणाला, सरपंच काका गावात एवढी गरिबी का? एवढं पाणी आहे नदीला. लोक शेती करत नाहीत का? कष्ट करीत नाहीत का? विशालच्या या प्रश्नाने सरपंच चपापले. पण सावध होऊन सांगू लागले, अरे विशाल आपल्या गावावर कोणीतरी करणी केली आहे. त्यामुळे गावावर सतत संकटे येतात. काम करूनही लोकांना फायदा होत नाही आणि आजारपण तर चालूच असते. त्या देवळातल्या साधू महाराजांमुळे गाव तरले आहे. त्यांची मोठी कृपा आपल्या गावावर आहे. सरपंचाच्या बोलण्यावर विशाल आणि मित्रांचा विश्वास बसेना. पण त्यांनी सारे ऐकून घेतले.

संध्याकाळी विशाल एकटाच बाहेर पडला. मंदिरात आरती सुरू होती. विशाल तिकडे गेला. बघतो तर काय तीनशे-चारशे लोक आरतीसाठी उभे होते. टाळ्या वाजवत होते. नाचत होते. समोर साधू महाराजही तल्लीन झाले होते. अर्ध्या तासाने आरती संपली. लोकांनी धडाधड आरतीच्या ताटात पैसे टाकले. कोणी शंभर तर कोणी पाचशे. महाराजांचा आशीर्वाद घेऊन लोक घरी परतले. साधू महाराज सगळे पैसे गोळा करत होते. तेवढ्यात तिथे सरपंच हजर झाले. महाराजांनी गोळा झालेले सर्व पैसे सरपंचांकडे दिले. आता मात्र विशालची खात्री पटली. साधू महाराज आणि सरपंच या भोळ्या गावकऱ्यांना देवाच्या कोपाची, भुताखेताची भीती दाखवून लुबाडत आहेत. गाव अंधश्रद्धेमध्ये विचारशक्ती गमावून बसले आहेत. पण आता लोकांचा भांडाफोड करायचाच. या विचाराने तो आणि त्याचे मित्र काम करू लागले. तालुक्याच्या पोलिसांनाही त्याने सामील केले आणि दुसऱ्याच दिवशी त्यांना ही संधी मिळाली.

झोपायला जातो असे सांगून विशाल आणि विनायक रात्री १०-११च्या सुमारास घराबाहेर पडले. तेवढ्यात कुणी तरी पळत जाताना त्यांना दिसले. त्याच्या हातात कसली तरी बोचकी दिसत होती. विशालने नीट पाहिले तर सरपंच आणि साधू महाराज...! पुढे धावत जाऊन ते एका गाडीत बसले. विशाल लगेचच फोनवरून कुणाशी तरी दबक्या आवाजात बोलला. मग दोघेही पटकन घरात गेले अन् झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता विशाल आणि मंडळी जागी झाली. तेव्हा पोलिसांचा सरपंचाच्या घराला गराडा पडला होता. विशाल आणि त्याचे मित्र डोळे चोळत झोपेतून उठले. सरपंचांची आई जोरजोरात रडत होती. ओरडत होती. कुणा मेल्यानं पोलिसांत तक्रार केली. तरी मी त्याला किती वेळा सांगितलं, त्या साधूच्या नादी लागू नको. पण ऐकले नाही माझे. यावेळी विशालच्या चेहऱ्यावर चिंतेचा पत्ताच नव्हता. उलट ढोंगी साधू आणि लबाड सरपंचापासून गावातल्या भोळ्याभाबड्या लोकांना वाचवण्याचे समाधान मात्र

## उपदेशकथा: बलाढ्याशी लढा



एकदा एका उन्मत्त हत्तीनं वृक्षाला धडक दिली. चिमणा- चिमणीचं घरटं उद्ध्वस्त होऊन खाली पडलं. त्यातली अंडी फुटून गेली. ती दोघं दु:खी झाली. हत्तीला धडा शिकवायचा होता त्यांना पण कसा, हा प्रश्न होता. त्याचं सांत्वन करायला आलेल्या माशी, बेडूक व सुतार पक्ष्यानं मिळून एक युक्ती केली. चिमणा-चिमणीला धीर दिला. आपण दुर्बल असलो तरी काय झालं? बलाढ्याशी लढा देऊ. मग ठरल्याप्रमाणे हत्तीच्या कानापाशी माशी गुणगुणली. खड्ड्याच्या टोकापाशी बेडकानं आवाज काढला. तिथे पाणी असावं म्हणून हत्तीनं तिथे पाऊल ठेवलं आणि तो खड्ड्यात पडला. सुतार पक्ष्यानं या गडबडीत त्याचा डोळा फोडला. अशारीतीने तिघांना एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने त्या बलाढ्य हत्तीला धडा शिकविला.

**कथा उपदेश : थोडी युक्ती, साहस आणि एकी असेल तरी बलाढ्याशीही लढा देता येईल.**

# आत्महत्या रोखण्यासाठी जागरूकता गरजेची



**देशात आत्महत्येचं प्रमाण दिवसागणिक वाढताना दिसत आहे. देशातच नाही तर जगभरात प्रत्येक वर्षाला जवळपास ८,५०,००० लोक आत्महत्या करतात, तर १५ मिलियन लोक आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न करतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, १५ ते १९ वर्षे या वयोगटातील आत्महत्या हे मृत्यूचं प्रमुख कारण आहे. आत्महत्येमागे नैराश्य, असहाय्यता आणि जीवन व्यर्थ असल्याची भावना असते. यामागे वैद्यकीय कारणंही असतात. आत्महत्या अर्थात स्वतःचा जीव घेणे ही वृत्ती. तणाव, दुःख, निराशा, अपयश, एकाकीपणा, अपमान आणि गरिबी, वृद्धत्व, गंभीर आजार आत्महत्येची प्रमुख कारणं म्हणता येतील. समस्या सोडवण्याचा कोणताही मार्ग नाही असे वाटणारे लोक आत्महत्या करतात.**

कार आत्महत्या हा वेदना संपवण्याचा एकमेव मार्ग आहे; परंतु तुम्ही सुरक्षित राहण्यासाठी पावले उचलू शकता आणि पुन्हा तुमचे जीवन आनंदाने जगू शकता.

आत्महत्या हा मानसिक आजार आहे. दैनंदिन जीवनात आत्महत्या ही एक गंभीर समस्या आहे. एका रिसर्चमध्ये केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १५ ते ३५ वर्षे वयोगटातील पुरुष आणि स्त्रिया जास्त आत्महत्या करतात. छोटी छोटी संकटे आली तरी हल्ली लोकांच्या मनात आत्महत्येचे विचार मनात घोंगावू लागतात. समस्या, दुःख प्रत्येकाच्या वाट्याला असतात. त्यावर मात करायची तयारी ठेवली पाहिजे. आत्महत्या करून संकटे संपत नसतात. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येमुळे वाढत्या आत्महत्यांचा विषय ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आता वाढत्या आत्महत्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज झाली आहे. कोणाचेही मन ओळखणे तशी अवघड गोष्ट असते. मनात काय विचार सुरू आहेत हे ओळखणे तसे कठीणच आहे. आपल्याकडे लोक काय म्हणतील, आपल्यातील दोष किंवा आपल्यातला कमकुवतपणा दुसऱ्यासमोर दाखवायचा नाही अशी संस्कृती आहे. मानसिक आजारांबद्दल अजूनही संकोच, लाज किंवा नकारात्मकता प्रत्येकामध्ये असते. कामाचा ताण, स्पर्धा, अपेक्षा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणाला काही सांगायचे नाही हाच मोठा धोका आहे. त्यामुळे दरवर्षी लाखो लोक मानसिक ताण, सामाजिक दबाव किंवा एकटेपणामुळे टोकाचे पाऊल उचलत आपला जीव गमावतात. बहुतेक लोकांना जगायचे असते, पण त्यांची परिस्थिती किती भयानक आहे आणि त्यांना पर्यायी उपाय दिसत नसल्याने ते अडकलेले वाटतात. काही लोकांसाठी, तर्क करण्याची आणि समस्या सोडवण्याची सकारात्मक उपाययोजना करण्याची त्यांची क्षमता प्रभावित होते, परिणामी आवेगपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. दहावी, बारावी परीक्षेचीत अपयश आले तरी मुलांच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागतात.

ही चांगली गोष्ट नाही. दहावी, बारावी म्हणजे पूर्ण आयुष्य नसते. पुढे भरपूर आयुष्य असतं. हे समजावून सांगण्याची गरज असते. आज आपल्या राज्यात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. विशेषतः ते तरुणांमध्ये जास्त आहे. नैराश्य, चिंता, एकटेपणा हे दिसत नसले तरी ते आजारच आहेत. वारंवार उदास राहणे, सातत्याने निराशावादी बोलत राहणे, स्वतःला इजा करण्याबद्दल बोलणे, सामाजिक माघार घेणे, एकटे राहण्याची इच्छा व्यक्त करत राहणे. मानसिक आरोग्याच्या समस्या, नोकरी गमावणे, कर्ज, कौटुंबिक तणाव, आधाराचा अभाव, सामाजिक संपर्काचा अभाव असतो. यामुळे आत्महत्यांचे विचार मनात येत असतात. एकमेकांशी बोलण्यापेक्षा किंवा गोष्टी शेअर करण्यापेक्षा आयुष्य संपवण्याचे धाडसी पाऊल उचलले जाते. ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

मुळात कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते हे लक्षात घेतले पाहिजे. कारण अंधारानंतर प्रकाश हा असतोच. त्यामुळे एक नवी पहाट येतेच. त्यामुळे कुठल्याही समस्येवर आत्महत्या हा तोडगा नाही. कोणतीही समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करत राहणे गरजेचे असते. त्या प्रयत्नांना यश मिळेलच असा सकारात्मक विचार करणे गरजेचे असते. या सकारात्मतेमुळेच वेगळी ऊर्जा मिळते. त्यानंतर एक वेगळाच उत्साह येत असतो. आजच्या डिजिटल युगात संवाद कमी झाला आहे. पण, 'संवाद' हा आत्महत्या रोखण्यासाठीचे उत्तम औषध आहे. आपल्या अडचणी, समस्या एकमेकांना सांगितल्या तर त्या सोडवण्यासाठी मदत होते. त्यामुळे जवळचे मित्र, जवळची व्यक्ती यांच्याशी संवाद ठेवणे महत्त्वाचे असते.

यामुळे मनावरील ताणही हलका होतो. तसेच ताण असेल तर समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ यांचा सल्लाही घेणे महत्त्वाचे ठरते. तुम्ही एकटे नाही, कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते. त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागृत करणे गरजेचे असते. त्यामुळे त्यांची सामाजिक, शैक्षणिक प्रगती सुधारण्यास मदत होते, असे आशेचे संदेश देणेही त्यांच्यामध्ये बळ निर्माण करू शकतात. त्यामुळे असे आशेचे संदेश देणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या काळात शाळेतल्या विद्यार्थ्यांपासून ते तरुण आणि ज्येष्ठांपर्यंत तणावाचे प्रमाण अधिक आहे. हा तणाव दूर करण्यासाठी योग्य पद्धतीने समुपदेशन होणे गरजेचे आहे. तणावाविरुद्ध लढाई जिंकणे महत्त्वाचे आहे. आत्महत्येचे विचार टाळण्यासाठी सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे. कोणाला मदतीची गरज असेल तर त्यासाठी तत्परता दाखविली तर आपल्यासोबत कोणीतरी आहे, अशी आत्मीयता त्यांच्यामध्ये निर्माण होते. त्याच्यातून त्यांना ताण कमी होण्यास मदत होते. शारीरिक आरोग्याइतकीच मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही आता काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आत्महत्येसारख्या गंभीर विषयाबाबत जागरूकता निर्माण करणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. समस्येबद्दल, जागरूकता वाढवण्याबद्दल नाही तर ती आत्महत्या समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्याबद्दल आहे. राष्ट्रीय आत्महत्यांचा डेटा नोंदवल्या गेलेल्या शेवटच्या काळात ३,००० हून अधिक लोकांनी आत्महत्या केल्या हे जाणून घेणे एक गोष्ट आहे. चिंता आणि ताणतणावांना दाबून ठेवणे (कारण कोणीतरी असे मानते की जर ते याबद्दल बोलले तर त्यांना दोषी ठरवले जाईल किंवा कमकुवत पाहिले जाईल) आत्महत्येच्या दरात वाढ होण्यास हातभार लावते हे जाणून घेणे दुसरी गोष्ट आहे. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. ऑस्ट्रेलियाच्या चिंताजनक आत्महत्येच्या आकडेवारीबद्दल जागरूकता वाढवणे ही एक चांगली सुरुवात आहे. बदल प्रभावी होण्यासाठी, आपल्यापैकी अधिकाधिक लोकांना आत्महत्येच्या दरामागील कारणे समजून घेणे आवश्यक आहे.

## डॉक्टर टिप्स

**पाळीविषयीबोलूया : 'मासिक पाळीदरम्यान जोडीदारासोबत सहवास? योग्य की अयोग्य?**


**-एल. ग्रिफिथ**

**अभ्यास काय सांगतो?**

मात्र एवढा अभ्यास होऊनही याविषयावर संशोधक ठोस असा निष्कर्ष काढू शकलेले नाहीत.

**सहवासची इच्छा**

२८ वर्षांच्या कॅथरीने तिचा अनुभव मला सांगितला. पाळीदरम्यान सहवास करावंसं वाटण्याची इच्छा अन्य दिवसांच्या तुलनेत अत्यंत वेगळी असते. काही गोष्टी अगदीच संवेदनशील असतात. या काळात सहवास करण्याबाबत मी उतावीळ नसते.



सहवासदरम्यानच्या वेगवेगळ्या पोझिशन्सबाबत मी आग्रही नसते. पण या काळात सहवासची गरज खूप आतून जाणवते. ती शारीरिकपेक्षा मानसिक गरज असल्यासारखं वाटतं. सहवासमधून कंफर्ट मिळतो. पाळीदरम्यान प्रत्येक स्त्रीच्या भावना वेगवेगळ्या असतात. काही महिलांना पाळीच्या वेळी आराम करावासा वाटतो. पण यासंदर्भात विज्ञान काय सांगतं हे जाणून घेण्यासाठी कॅलिफोर्निया विद्यापीठातल्या स्त्रीरोग विशेषतज्ज्ञ रचेल न्यूमन यांच्याशी संवाद साधला.

## विनोद




अरुण : 'कोंबडीला तू गरमागरम पाण्याने आंघोळ का घालतोस रोज रोज?'

वरुण : 'तिने उकडलेले अंडे द्यावे म्हणून.'

## संदेश

santa ne apne frnd ko lunch pe invite kiya
Santa apne friend se:tumjhe khane mai kya pasand hai..
friend : fish..
santa:pr meri biwi ko fish banana nahi ata hai..
friend: mai batata hu..yeh le reciepe
santa market gaya...woh fish le kr aa raha tha raste mai chil ushka fish le k udd gaya
santa:leja leja sali.....pr pakayegi kaise??reciepe to mere pass hai.

## सुविचार



चिंतेला चिंतनामध्ये बदलावा.

- डेल कार्नेजी


**संस्कृत सुभाषित**

**विद्यावत: कुलीनस्य धनं याचि तुमिच्छत:।**
**कण्ठे पारावतस्येव वाक्करोति गतागतम्॥**

**अर्थ** : कुलीन विद्वानांवर जेव्हा द्रव्य याचनेचा प्रसंग येतो, तेव्हा त्यांचे शब्द कबुतरासारखे कंठातच घुटमळतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. ९



## आडवे शब्द

१. रात्रीच्या रात्री
४. फोटो
६. राष्ट्रगीताची सुरुवात
११. शंभर पैसे
१३. बाजेची कापडी पट्टी
१४. सोन्याचा धागा
१५. वाईट
१७. हमाल
१९. निबर, एक इंग्रजी महिना
२१. अडत्या
२३. खर्चच्या विरूद्ध
२५. पोवाडे म्हणणारा
२७. फांदी तुटतानाचा आवाज
२९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव
३१. रोख
३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ
३४. मालक
३५. हे जसे-फळ तसेच!
३६. पाळता येईल असा प्राणी
३८. कोष्टी, कापड विणणारा
४०. दिल्लीचे विमानतळ
४२. छोटा, लहान
४३. सैन्य
४४. कवडीमोल
४६. शहर
४८. मुलगा, पुत्र
५१. जुळे
५२. उगीच
५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी
५६. शेतकरी (हिंदी)
५८. गाजावाजा
५९. पळून जाणे
६०. मोठी गंमत
६१. रंग बदलणारे फूल
६२. नम्र, वाकलेला
६४. एक आंबट-गोड फळ
६५. खूप
६६. चालू दिवस
६७. ओघ, पाण्याचे वाहणे
६९. थडगे
७१. फटाक्याची माळ
७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली
७४. मृत्यूदेवता
७५. जनक राजाची मुलगी
७८. झडती (हिंदी)
७९. एकूण एक, सर्व
८०. फेटाळणे
८१. लक्ष्मी

## उभे शब्द


१. अडखळत बोलणारा, ३. झाड, वृक्ष
४. सावली
५. पुष्कळ
६. आई-वडील
७. नवीन
८. नडलेला अडलेला
९. मला
१०. श्रेष्ठ पुरुष
१२. पैंजण
१५. पाषण
१६. पाणकोंबडा
१७. हिंदुस्थान
१८. राबता, ये-जा
२०. धुंदी, कैफ
२२. आवडता, प्रिय
२४. कापड विणण्याचे साधन
२६. साठावा वाढदिवस
२८. कोवळी फांदी
२९. चाळीस शेर
३०. पोते शिवण्याची सुई
३३. जाड दोर
३४. पृथ्वी
३६. हालचालीवर ठेवलेली नजर
३७. वर्तुळ
३८. गणपती
३९. कमीत कमी व जास्तीत जास्त
४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी
४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. रविवार
४९. दृष्टीभेट
५०. प्रकाश, कांती
५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी
५४. देवाण-घेवाण
५५. रेलण्याची उशी
५७. प्रामाणिक
६०. श्रीमंत
६१. दाहक आम्ल (हिंदी)
६३. ग्रामीण बोलीत तेव्हा
६५. लाभदायक
६६. आजूबाजूला
६८. अंकित माणूस, हेर
६९. लावणीतील पास असे असते!
७०. प्रजा
७३. मांडणी
७४अ. मज
७५. एक मिश्र धातू
७६. ओटा, पार
७७. न्यायाने वागणारा

## आडवे उत्तरे

१.रातोरात ४.छायाचित्र ६.जन गण मन ११.रुपाया १३.नवार १४.जर १५.खराब १७.भारवाहक १९.जून २१.दलाल २३.जमा २५.शाहीर २७.कडकड २९.मतदार ३१.नगद ३२.कारण ३४.धनी ३५.कर्म ३६.पाळीव ३८.विणकर ४०.पालम ४२.लघु ४३.जुना ४४.मातीमोल ४६.नगर ४८.तनय ५१.यमल ५२.हकनाक ५४.आजतक ५६.किसान ५८.गवगवा ५९.परागंदा ६०.धमाल ६१.तेरडा ६२.नत ६४.अननस ६५.सर ६६.आज ६७.प्रवाह ६९.कबरस्तान ७१.सर ७२.नरबळी ७४.दर्द ७५.जनककन्या ७८.तलाशी ७९.समस्त ८०.नातलग ८१.रमा

## उभे उत्तरे

२.तोतरा ३.तरू ४.छाया ५.चिक्कार ६.जनकजननी ७.नवा ८.गरजू ९.मज १०.नरवर १२.पायल १५.खडक १६.बदक १७.भारत १८.वावर २०.नशा २२.लाडका २४.माग २६.हीरक २८.डहाळी २९.मण ३०.दाभण ३३.रस्सी ३४.धरती ३६.पाळत ३७.वलय ४१.मनकवडा ४५.मोहन ४७.रविवासर ४९.नजरानजर ५०.तेज ५३.नागर ५४.आदानप्रदान ५५.तक्क्या ५७.सालस ६०.धनवान ६१.तेजाब ६३.तवा ६५.सनदशीर ६६.आसपास ६८.हस्तक ६९.कळी ७०.रयत ७३.रचना ७५.जस्त ७६.कट्टा ७७.न्यायी



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### नीरज चोप्राच्या पत्नीने टेनिसला केले अलविदा

दिल्ली-भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राने जानेवारी २०२५ मध्ये लग्नगाठ बांधली. नीरज चोप्राची पत्नी हिमानी मोर ही टेनिसपटू आहे. तिने तिच्या करियरबाबत मोठा निर्णय घेतला आहे.
हिमानीने टेनिसपटू म्हणून काम केलं आहे आणि आता तिने या खेळाला अलविदा म्हणण्याचा निर्णय घेतला आहे. २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या हिमानी हिच्या वडिलांनी ही माहिती दिली आहे.
महिला एकेरीत हिमानीची कारकिर्दीतील सर्वोत्तम रँकिंग ४२ आहे. तिने पदार्पणाच्या पहिल्याच वर्षात ही कामगिरी केली. एकेरी व्यतिरिक्त, तिने दुहेरी सामने देखील खेळले आणि यातील तिची सर्वोच्च रँकिंग २७ आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हिमानीच्या वडिलांनी सांगितलं आहे की तिला १.५ कोटी रुपयांची नोकरीची ऑफर देखील होती जी तिने नाकारली.
हिमानीने दिल्ली विद्यापीठातून राज्यशास्त्रात पदवी मिळवली आहे. याशिवाय तिने फ्रँकलिन पियर्स विद्यापीठातून क्रीडा आणि व्यवस्थापन विषयात पदवी देखील मिळवली आहे. हिमानीचा टेनिस सोडण्याचा निर्णय छोटासा नाही. कोणत्याही खेळाडूसाठी खूप कमी वयात कारकिर्दीला निरोप देणं सोपं नसतं. हा निर्णय घेण्यापूर्वी हिमानीने पुढे काय करायचं हे देखील निश्चित आहे.
हिमानी आता एक नवीन सुरूवात करणार आहे. म्हणूनच तिने एका मोठ्या नोकरीच्या ऑफरलाही नकार दिला आहे. हिमानीने आता क्रीडा व्यवसायात हात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. ती एक ती बिझनेस वुमन बनण्याच्या मार्गावर आहे.
हिमानी किंवा नीरज चोप्रा यांच्याकडून अद्याप या संदर्भात कोणतीही अधिकृत बातमी आलेली नाही. मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा केला जात आहे की हिमानी स्पोर्ट्स बिझनेस सुरू करणार आहे. ती काय करणार आहे आणि कधीपासून सुरुवात करणार आहे याबद्दल अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.
हिमानी आणि नीरज यांचे लग्न या वर्षी जानेवारीमध्ये झाले. हे लग्न निवडक कुटुंबिय आणि मित्रपरिवारासह झाले. दोघांनीही सोशल मीडियावर पोस्ट करून त्यांच्या लग्नाची माहिती दिली होती. हे लग्न हिमाचल प्रदेशातील सोलनमध्ये झालं. लग्नानंतर लगेचच दोघेही अमेरिकेला गेले कारण नीरजला एका स्पर्धेत भाग घ्यायचा होता. यामुळे लग्नानंतर अद्याप रिसेप्शन झालेलं नाही.

***

### मुंबईचा गोलंदाज ऑस्ट्रेलियात चमकला!

मुंबई-ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये ३ टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने २ गडी राखून विजय मिळवला. यासह ही मालिका २-१ ने आपल्या नावावर केली. या सामन्यात गोलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेकडून कॉर्बिन बॉशने दमदार गोलंदाजी केली. त्याने या डावात गोलंदाजी करताना ३ गडी बाद केले. यादरम्यान त्याने असा पराक्रम करून दाखवला आहे, जो याआधी कुठल्याही गोलंदाजाला करता आला नव्हता.
या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विजयासाठी १७३ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या सामन्यातील शेवटच्या २ षटकात ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १० धावा करायच्या होत्या. यादरम्यान दक्षिण आफ्रिकेकडून १९ वे षटक टाकण्यासाठी कॉर्बिन बॉश गोलंदाजीला आला. या षटकात त्याने दमदार गोलंदाजी केली आणि ऑस्ट्रेलियाच्या २ फलंदाजांना बाद केलं. त्याने बेन ड्वार्शियस आणि नॅथन एलिसला बाद करत माघारी धाडलं. २ गडी बाद करत असताना त्याने या षटकात एकही धाव खर्च केली नाही. यासह तो ऑस्ट्रेलियाविरूद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये डबल विकेट मेडन विकेट टाकणारा पहिलाच गोलंदाज ठरला आहे. तसेच कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या ८ संघांमध्ये अशी कामगिरी करणारा तो दुसराच गोलंदाज ठरला आहे. याआधी २०२४ मध्ये झिम्बाब्वे विरूद्ध झालेल्या सामन्यात भारताचा फिरकी गोलंदाज रवी बिश्नोने दोन गडी बाद करून निर्धाव षटक टाकलं होतं.
या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने २० षटकांअखेर ७ गडी बाद १७२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून २६ चेंडूत ५३ धावांची दमदार फलंदाजी केली. तर रासी वान डर डुसेनने २६ चेंडूत नाबाद ३८ धावांची खेळी केली. तर ट्रिस्टन स्टब्सने २५ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना नॅथन एलिसने ३१ धावा खर्च करून ३ गडी बाद केले. तर ॲडम झाम्पाने २ आणि जोश हेझलवूडने २ गडी बाद केले.ऑस्ट्रेलियाला हा सामना जिंकण्यासाठी १७३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना ग्लेन मॅक्सवेलची बॅट चांगलीच तळपली. त्याने ३६ चेंडूंचा सामना करत नाबाद ६२ धावांची खेळी केली. तर मिचेल मार्शने ३७ चेंडूत ५४ धावांची खेळी केली. दक्षिण आफ्रिकेकडून कॉर्बिन बॉशने ३, कगिसो रबाडा २ आणि क्वेना मफाकाने २ गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाने हा सामना २ गडी राखून आपल्या नावावर केला.

## आशिया कपसाठी लवकरच होणार टीम इंडियाची घोषणा

मुंबई: आशिया कप २०२५ साठी भारतीय क्रिकेट संघाची निवड लवकरच केली जाण्याची शक्यता आहे. या स्पर्धेत निवड समिती काही मोठे निर्णय घेणार असल्याचे दिसत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, युवा फलंदाज यशस्वी जयस्वाल आणि अनुभवी फलंदाज श्रेयस अय्यर यांना या स्पर्धेतून वगळले जाण्याची शक्यता आहे. दोघांनीही नुकत्याच झालेल्या स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केली असूनही, हा निर्णय संघाच्या सध्याच्या धोरणाचा भाग असल्याचे मानले जात आहे.
जयस्वालवर कसोटीवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना: यशस्वी जयस्वालने इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत चांगली कामगिरी केली होती. त्यामुळे निवड समितीने त्याला कसोटी क्रिकेटवर अधिक लक्ष केंद्रित करण्यास सांगितले असल्याची चर्चा आहे.श्रेयस अय्यरसाठी स्पर्धेत वाढ: श्रेयस अय्यरने आयपीएल २०२५ मध्ये



चांगली कामगिरी केली असली तरी, संघ व्यवस्थापन फलंदाजीच्या सध्याच्या कॉम्बिनेशनमध्ये बदल करण्यास उत्सुक नाही. सूर्यकुमार यादव, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि रिंकू सिंग हे खेळाडू संघात आपले स्थान टिकवून ठेवण्याची शक्यता आहे.शुभमन गिलचे पुनरागमन: भारताचा कसोटी कर्णधार शुभमन गिल टी२० संघात पुनरागमन करण्याची शक्यता आहे. त्याला टी२० मध्ये उपकर्णधारपदाची जबाबदारीही दिली जाण्याची शक्यता आहे.
दुबे आणि जितेश शर्माला संधी: अष्टपैलू शिवम दुबे आणि यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्मा यांनाही संघात स्थान मिळण्याची शक्यता आहे. रवींद्र जडेजाला मात्र विश्रांती दिली जाऊ शकते.
कर्णधारपदी सूर्यकुमार यादव कायम: आशिया कपमध्ये टीम इंडियाचे नेतृत्व सूर्यकुमार यादवच करतील हे जवळपास निश्चित आहे, कारण कर्णधार म्हणून त्यांचा चांगला रेकॉर्ड आहे.आशिया कप ९ सप्टेंबरपासून संयुक्त अरब अमिराती (ण-ए) मध्ये सुरू होणार असून, टी२० विश्वचषक २०२६ च्या दृष्टीने ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय संघाची अधिकृत घोषणा लवकरच अपेक्षित आहे.

## याच दिवशी जेव्हा धोनीने घेतली होती निवृत्ती

मुंबई: आजपासून बरोबर पाच वर्षांपूर्वी, १५ ऑगस्ट २०२० रोजी, भारताच्या स्वातंत्र्यदिनी भारतीय क्रिकेट चाहत्यांना एका मोठ्या धक्क्याला सामोरे जावे लागले. भारताचे माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आणि त्यांच्या पाठोपाठ लगेचच त्यांचे सहकारी सुरेश रैना यांनीही हाच निर्णय जाहीर केला. या दोन दिग्गजांच्या निवृत्तीला आज पाच वर्षे पूर्ण झाली आहेत.
महेंद्रसिंग धोनीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडिओ शेअर करून हा निर्णय जाहीर केला होता. 'मला नेहमीच मिळालेल्या प्रेमाबद्दल आणि समर्थनाबद्दल तुमचे खूप खूप आभार. संध्याकाळी ७ वाजून २९ मिनिटांपासून मला निवृत्त समजले जावे,' अशा भावनिक संदेशासह धोनीने ही घोषणा केली. यानंतर काही वेळातच सुरेश रैनानेही धोनीसोबतचा एक फोटो शेअर करत 'माही तुमच्यासोबत खेळणे खूप छान होते. या प्रवासात तुमच्यासोबत सामील होण्याचा मला अभिमान आहे. धन्यवाद भारत. जय हिंद!' असे लिहित आपल्या निवृत्तीची घोषणा केली.या दोन्ही खेळाडूंच्या या निर्णयाने क्रिकेट जगतासह चाहत्यांना मोठा धक्का बसला होता.
धोनीने आपल्या शांत आणि संयमी नेतृत्वाने भारतीय संघाला २००७ चा टी-२० विश्वचषक, २०११ चा एकदिवसीय विश्वचषक आणि २०१३ ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून दिली. तर सुरेश रैना मधल्या फळीतील एक



महत्त्वाचा फलंदाज आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून ओळखला जातो.
त्यांच्या या निवृत्तीनंतरही दोघांची मैत्री कायम आहे. आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळताना त्यांची जोडी अनेकदा पाहायला मिळाली आहे. आजही हे दोन्ही खेळाडू क्रिकेट चाहत्यांच्या मनात घर करून आहेत आणि त्यांच्या निवृत्तीची ही पाच वर्षे त्यांच्या कारकिर्दीची आठवण करून देत आहेत.



## प्रत्येक वेळेस थोडीच रिटायरमेंट घेणार?

### रोहित शर्माने निवृत्तीवर दिले मजेशीर उत्तर, पंतने शेअर केला व्हिडिओ

मुंबई: भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त, भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतने (ठळीहरलह झरपीं) सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे, जो सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ (खउउ उहराळिपी ढीहि २०२५) जिंकल्यानंतरच्या ड्रेसिंग रूममधील सेलिब्रेशनचा आहे, ज्यात खेळाडूंच्या आनंदाचे क्षण कैद आहेत.या व्हिडिओमध्ये एक अत्यंत मजेशीर क्षण पाहायला मिळतो, जिथे ऋषभ पंत कर्णधार रोहित शर्माला (ठेहळीं डहरीर) एक प्रश्न विचारतो. व्हिडिओच्या शेवटी पंत रोहितला विचारतो की, भैय्या, हे स्टंप घेऊन कुठे चालला आहात?
यावर रोहित शर्मा हसत हसत उत्तर देतो, काय? रिटायरमेंट घेऊ का? प्रत्येक वेळी जिंकल्यानंतर मी थोडीच रिटायरमेंट घेत बसणार?
रोहितच्या या उत्तरावर ऋषभ पंत आणि इतर खेळाडू हसताना दिसतात. पंत म्हणतो, आम्ही तर इच्छितो की तुम्ही खेळत रहा.
रोहित शर्मा आणि विराट कोहलीने २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली होती. त्यानंतर त्यांनी टेस्ट क्रिकेटमधूनही निवृत्ती घेतली आहे. त्यामुळे आता ते फक्त वनडे क्रिकेटमध्येच खेळत आहेत. अशा परिस्थितीत, चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर चाहत्यांना पुन्हा एकदा त्यांच्या निवृत्तीची भीती वाटत होती. मात्र, रोहितच्या या मजेशीर उत्तराने त्याने हे स्पष्ट केले आहे की, त्याचा वनडे क्रिकेट सोडण्याचा कोणताही इरादा नाही.
पंतने हा व्हिडिओ शेअर करताना, स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा, भारत. काही क्षण कायम स्मरणात राहतात आणि भारतासाठी जिंकणे हे त्यात सर्वात वर आहे. मला भारतीय असल्याचा अभिमान आहे, असे भावनिक कॅप्शन लिहिले आहे.

## मनू भाकरने व्हायोलिनवर राष्ट्रगीत वाजवून दिली मानवंदना

नवी दिल्ली: ऑलिंपिक पदक विजेती मनू भाकरने व्हायोलिनवर राष्ट्रगीत वाजवून भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला. या कुशल नेमबाजाने आपल्या इनस्टाग्राम अकाऊंटवरून व्हायोलिनवर राष्ट्रगीत वाजवतानाचा व्हिडिओ शेअर करत, भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाला मानवंदना दिली. मनू भाकरच्या प्रभावी कारकिर्दीत ऑलिंपिक पदके, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा जिंकणे आणि राष्ट्रकुल तसेच आशियाई खेळांमधील यश यांचा समावेश आहे.मनू भाकरने इनस्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये तिने व्हायोलिनवर राष्ट्रगीत वाजवत लोकांना मंत्रमुग्ध केले.
या व्हिडिओबरोबरच तिने हृदयस्पर्शी असे कॅप्शनदेखील दिले आहे. व्हिडिओ शेअर करत तिने लिहिले, या स्वातंत्र्यदिनी माझ्या हृदयाच्या सर्वात जवळचे गाणे वाजवण्याचा एक प्रयत्न. मी जेव्हा जेव्हा भारताचे प्रतिनिधित्व करते तेव्हा मला व्यासपीठावर उभे राहून हे गीत ऐकायचे असते. साधारणपणे आपण बसून व्हायोलिन वाजवतो. पण राष्ट्रगीत वाजवत असल्यामुळे आम्ही उभे राहिलो. आपल्या देशाची प्रशंसा शब्दांत मांडता येत नाही. जय हिंद!
गेल्या वर्षी पॅरिस ऑलिंपिकमध्ये, मनू भाकरने महिलांच्या वैयक्तिक १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत कांस्यपदक जिंकत, ऑलिंपिक पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला नेमबाज बनून इतिहास रचला. या कामगिरीनंतर तिने सरबजोत सिंगसोबत १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत आणखी एक कांस्यपदक मिळवले, ज्यामुळे भारताचे ऑलिंपिकमधील पहिलेच नेमबाजीमधील सांघिक पदक ठरले. मात्र, भाकरचे तिसरे ऑलिंपिक पदक थोडक्यात हुकले. ती महिलांच्या २५ मीटर पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत चौथ्या स्थानावर राहिली, ज्यामुळे ती एकाच ऑलिंपिकमध्ये तीन पदके जिंकणारी पहिली भारतीय बनू शकली असती. २०२१ च्या टोकियो ऑलिंपिकमधील निराशाजनक मोहिमेनंतर पॅरिसमधील तिने हे घवघवीत यश मिळवले आहे.



## आशिया कपसाठी संघ जाहीर करताच पाकिस्तानने भारताला डिवचले, म्हणाला, आमचे १७ खेळाडू पुरेसे

दिल्ली,१७ ऑगस्ट (पीएसआय) आशिया कप २०२५ चा थरार ९ सप्टेंबरपासून दुबईत रंगणार असून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपल्या १७ जणांच्या संघाची घोषणा (झरज्ञळीींरप अपर्पीपलश डींरिव श्री अीळर उीि २०२५) केली आहे. हा संघ मुख्य प्रशिक्षक माईक हेसन आणि निवड समितीचे सदस्य व माजी पाकिस्तानी खेळाडू आकिब जावेद यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आला. यावेळी आकिब जावेद यांनी भारत-पाकिस्तान सामन्याबाबत मोठे विधान केले.
आकिब जावेद यांना विचारले गेले की, निवडलेल्या या संघात १४ सप्टेंबरला होणाऱ्या भारताविरूद्धच्या सामन्यात जिंकण्याची ताकद आहे का? त्यावर उत्तर देताना त्यांनी सांगितले की, 'भारत-पाकिस्तान सामना हा जगातील सर्वात मोठा क्रिकेट सामना आहे. त्यात खेळणारे खेळाडू तसेच आजूबाजूचे प्रत्येकजण या सामन्याचे महत्त्व जाणून आहेत. आशिया कप २०२५ साठी ज्या १७ खेळाडूंची निवड झाली आहे, त्यांच्यात स्पर्धेतील कुठल्याही संघाला हरवण्याची क्षमता आहे.''
जावेद पुढे म्हणाले की, ''या संघात भारताला हरवण्याची क्षमता आहे. भारत-पाकिस्तान सामना हा केवळ एक क्रिकेट सामना नसून तो जगातील सर्वात मोठा सामना आहे. हे प्रत्येक खेळाडू आणि संबंधित व्यक्तींना ठाऊक आहे. या १७ खेळाडूंमध्ये कुठल्याही संघाला हरवण्याची ताकद आहे. त्यांच्यावर अनावश्यक दडपण

### पाकिस्तानच्या टीममध्ये पनौती खेळाडूची एन्ट्री, जिंकलेल्या मॅचही हरवतो!

मुंबई-आशिया कपसाठी पाकिस्तानच्या टीमची घोषणा करण्यात आली आहे. आशिया कपमध्ये पाकिस्तान सलमान अली आगाच्या नेतृत्वात खेळणार आहे. तर बाबर आझम आणि मोहम्मद रिझ्वान यांची टीममधून हकालपट्टी करण्यात आली आहे. आशिया कपसाठी पाकिस्तान युवा टीम घेऊन मैदानात उतरणार आहे, पण एका खेळाडूच्या निवडीमुळे पुन्हा एकदा पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर टीका करण्यात येत आहे.आशिया कपसाठी पाकिस्तानच्या टीममध्ये हसन अलीला टीममध्ये स्थान देण्यात आलं आहे. हसन अलीची पाकिस्तानच्या टीममध्ये निवड झाल्यानंतर पाकिस्तानी चाहते त्याचा उल्लेख पनौती असा करत आहेत. हसन अलीला याआधी टी-२० वर्ल्ड कप २०२१ च्या सेमी फायनलमध्ये मोठ्या प्रमाणावर ट्रोल करण्यात आलं होतं. सेमी फायनलमध्ये हसन अलीने ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू वेडचा सोपा कॅच सोडला होता.

## लिओनेल मेस्सीचा भारत दौरा ठरला, या तारखेला येणार मुंबईत!

नवी दिल्ली: अर्जेंटिनाचा सुपरस्टार लिओनेल मेस्सीच्या बहुप्रतिक्षित भारत दौऱ्याला अंतिम मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार या दौऱ्याची सुरुवात १२ डिसेंबर रोजी कोलकाता शहरातून होणार असून, यानंतर तो अहमदाबाद, मुंबई आणि नवी दिल्ली येथे देखील भेट देणार आहे. या कार्यक्रमाचे प्रवर्तक सताद्रु दत्ता यांनी शुक्रवारी (दि. १५ ऑगस्ट) ही माहिती दिली. 'ऋष्ठ-ढ र्ढीे ष खपवळर २०२५' असे नाव दिलेल्या या दौऱ्याद्वारे तो भारतातील फुटबॉलप्रेमींना भेटणार आहे, आणि त्यांना मार्गदर्शन देखील देणार असल्याचे म्हंटले जात आहे. त्यामुळे भारतातील फुटबॉलपटूसाठी तसेच लिओनेल मेस्सीच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. मेस्सीचा ३ दिवसीय भारत दौरा कसा असेल?
दत्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, मेस्सी १२ डिसेंबर रोजी कोलकाताला पोहचेल, तेथे दोन दिवस आणि एक रात्र तो राहील. दिनांक १३ डिसेंबर रोजी भेट आणि अभिवादन कार्यक्रमात तो सहभागी होईल. त्याच्यासाठी कोलकाता येथे एक खास जेवण आणि चहा महोत्सव असेल, ज्यामध्ये बंगाली मासे हिलसा, बंगाली मिठाई आणि आसाम चहाचा बेत आखला जाणार आहे. यानंतर, ईडन गार्डन्स किंवा सॉल्ट लेक स्टेडियममध्ये ऋष्ठ-ढ कॉन्सर्ट आणि ऋष्ठ-ढ कप आयोजित केला जाईल. यानंतर दुसऱ्या दिवशी, मेस्सीला खास भेट म्हणून दुर्गापूजेदरम्यान, त्याचे २५ फूट उंच आणि २० फूट रुंद भित्तीचित्र ठेवले जाणार आहे, ज्यावर त्याचे चाहते त्याच्यासाठी संदेश लिहू शकतील. हे स्टेडियममध्ये मेस्सीला भेट म्हणून दिले



जाईल. यादरम्यान तो प्रत्येक संघातील सात खेळाडूंचा सॉफ्ट टच आणि सॉफ्ट बॉल सामना खेळेल ज्यामध्ये सौरव गांगुली, लिएंडर पेस, जॉन अब्राहम आणि बायचुंग भुतिया यांचा देखील सहभाग असणार आहे. ईडन गार्डन्सवर होणाऱ्या या कार्यक्रमासाठी तिकिटाचा किमान दर ३५०० रुपये असणार आहे.
मेस्सी १३ डिसेंबर रोजी संध्याकाळी अहमदाबादमध्ये अदानी फाउंडेशनच्या एका खाजगी कार्यक्रमात सहभागी होईल.
'या' तारखेला मुंबईत येणार मेस्सी
अहमदाबाद दौऱ्यानंतर तो १४ डिसेंबर रोजी मुंबईत दाखल होणार आहे. जिथे दुपारी ३.४५ वाजता सीसीआय येथे 'मीट अँड ग्रीट' कार्यक्रम होईल. त्यानंतर, सायंकाळी ५.३० वाजता वानखेडे स्टेडियमवर ऋष्ठ-ढ कप आणि कॉन्सर्ट होईल. मुंबईतील सीसीआय ब्रेबॉर्न येथे मुंबई पॅडल ऋष्ठ-ढ कपचा सामना आयोजित केला जाईल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या सामन्यात मेस्सीसोबत शाहरुख खान आणि लिएंडर पेस पाच ते दहा मिनिटे मैदानात खेळू शकतात. ज्याचा अनुभव क्रीडा चाहत्यांना अनुभवता येणार आहे.
महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मेस्सी आणि सचिन तेंडुलकर, एमएस धोनी आणि रोहित शर्मा यांच्यासोबत ऋष्ठ-ढ कॅप्टन्स मोमेंट आयोजित करू शकते ज्यामध्ये रणवीर सिंग, आमिर खान आणि टायगर श्रॉफ देखील सहभागी होतील. त्यानंतर १५ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन या दौऱ्याचा समारोप होणार आहे.
२०११ नंतर मेस्सीचा हा पहिला भारत दौरा आहे, तेव्हा तो आपल्या राष्ट्रीय संघासोबत कोलकाता येथे व्हेंझुएलाविरुद्ध एक मैत्रीपूर्ण सामना खेळण्यासाठी आला होता. मेस्सीच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश भारतीय फुटबॉलपटूंच्या पुढील पिढीला प्रेरणा देणे हा आहे. मेस्सी प्रत्येक शहरात मुलांसाठी 'मास्टरक्लास' घेणार आहे.

# कार्यतत्परता डॉ. खानसोळे यांना उत्कृष्ट अधिकारी म्हणून पालकमंत्री यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी :** १५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी लातुर महानगर पालीका मा. उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे सर यांना मा.ना.श्री. शिवेद्रसिंह अभयसिंहराजे भोसले, मा. पालकमंत्री, लातूर जिल्हा यांचे हस्ते उत्कृष्ट अधिकारी म्हणुन पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी मा. जिल्हाधिकारी, श्रीमती वर्षा ठाकूर घुगे मॅडम (भाप्रसे), मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राहुलकुमार मीना सर (भाप्रसे) मा. आयुक्त श्रीमती मानसी मॅडम (भाप्रसे) मा. अमोल तांबे सर (भापोसे) यांची उपस्थिती होती खरे तर हा सन्मान लोकशाही व्यवस्थेत शासनाचे धोरण, निर्णय व योजना या सर्वांचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. या योजना योग्य प्रकारे लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे काम प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असते. शासनाचा खरा चेहरा म्हणजेच प्रशासकीय अधिकारी. त्यांच्या कामकाजावरून नागरिकांचे सरकारविषयी मत ठरते. म्हणूनच प्रामाणिकपणा, कार्यतत्परता व जनसेवेचा ध्यास घेऊन कार्य करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करणे ही समाजाची खरी कृतज्ञता आहे प्रशासकीय अधिकाऱ्यांची भूमिका प्रशासकीय अधिकारी हे केवळ कार्यालयीन कामकाज करणारे नसून ते समाज आणि शासन यांच्यातील दुवा असतात. त्यांची भूमिका बहुआयामी असते धोरणांची अंमलबजावणी शासनाने आखलेल्या योजना व धोरणे प्रत्यक्ष जमिनीवर कार्यान्वित करण्याचे काम. कायद्याचे पालन व सुव्यवस्था राखणे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे.विकास कार्याला चालना देणे शिक्षण, आरोग्य, उद्योग, शेती व पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत प्रगती साधणे.जनतेशी संवाद लोकांच्या समस्या समजून घेणे व त्यांचे निराकरण करणे.पुरस्काराचे महत्त्व प्रशासकीय अधिकारी जेव्हा समाजहितासाठी कठोर परिश्रम करतात, तेव्हा त्यांच्या कार्याला गौरविण्यासाठी दिलेले पुरस्कार समाजात अनेक सकारात्मक परिणाम घडवतात आदर आणि प्रेरणा पुरस्कार मिळाल्यामुळे त्या अधिकाऱ्याचा आत्मविश्वास दुणावतो आणि इतरांना चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळते. पारदर्शकता वाढते चांगल्या कामाचे कौतुक



झाल्यास इतर अधिकारीही प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न करतात.लोकांचा विश्वास प्रशासनाविषयी नागरिकांचा विश्वास दृढ होतो. यशाची नोंद एखाद्या अधिकाऱ्याने केलेले काम विस्मृतीत न जाता पुढील पिढ्यांसाठी आदर्श ठरते.आदर्श प्रशासकीय अधिकारी हे आपल्या कर्तृत्वामुळे ओळखले जातात अनेक अधिकारी कार्य करत आहेत लोककल्याणकारी कामे करून आदर्श निर्माण केले आहेत.अशा उदाहरणांमधून हे स्पष्ट होते की, पुरस्कार हा केवळ सन्मान नसून पुढील अधिकारी वर्गाला प्रेरणा देणारा दीपस्तंभ ठरतो.समाजावर होणारे परिणाम पुरस्कारप्राप्त अधिकारी हे आदर्शवत व्यक्तिमत्त्व बनतात. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे समाजात न्याय व समतेची भावना बळकट होते.दुर्बल घटकांना दिलासा मिळतो.नागरिक शासनाच्या योजनांकडे विश्वासाने पाहू लागतात.प्रशासनातील सकारात्मकता व पारदर्शकता वाढते शासन यंत्रणेतील प्रशासकीय अधिकारी हे शासनाचे हृदय आणि मेंदू आहेत. त्यांचे कार्य जितके प्रभावी, तितका समाजाचा विकास वेगवान. म्हणूनच समाजहितासाठी कार्य करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना पुरस्कार देणे ही औपचारिकता नसून जनतेचा प्रामाणिक सन्मान आहे. अशा पुरस्कारामुळे अधिकारी वर्गात नवी उमेद, तर समाजात नवा विश्वास जागृत होतो. पुरस्काराने सन्मानित केल्या बद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे

## दयानंद विज्ञान महाविद्यालयास बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद




**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड अंतर्गत अ विभाग आंतर महाविद्यालय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन दयानंद विधी महाविद्यालय,लातूरच्या वतीने करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये मुलांच्या एकूण सोळा महाविद्यालयाच्या संघाने सहभाग नोंदविला होता तसेच मुलींच्या स्पर्धेमध्ये एकूण दहा महाविद्यालयाच्या संघांनी सहभाग नोंदविला होता.मुलींच्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद मिळविले तसेच मुलांच्या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले आहे.मुलींच्या संघामध्ये कु अक्षदा गायकवाड, ऋतुजा उगिले,राजेश्वरी वाघमारे आणि कल्याणी गोमचाळे या विद्यार्थिनींचा सहभाग होता. मुलांच्या संघामध्ये विवेक कांबळे,ओमकार कसाबे,ओंकार सोमवंशी,श्रीराम माने,प्रज्वल लामतूरे आणि आदित्य शिरसागर या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या संघास दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.महेश बेंबडे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी, अ‍ॅड.आशिष बाजपाई, प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,डॉ.भास्कर रेड्डी व प्रा.निशिकांत सदाफुले यांनी अभिनंदन केले.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात विभागन एक विभिषिका दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** १४ ऑगस्ट हा दिवस विभाजन एक विभिषिका दिन म्हणून संपूर्ण देशभरात साजरा केला जात आहे. हा दिवस दयानंद वाणिज्य महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमास प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्रचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा आष्टेकर आदींची उपस्थिती होती. या पार्श्वभूमीवर नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा यांच्यातर्फे एक विशेष नाटक तयार करण्यात आले होते. सदरील नाटक विद्यार्थ्यांना स्क्रीन वर दाखविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांना ऐतिहासिक घडामोडीबद्दल ज्ञान मिळाले.

## माऊली शैक्षणिक संकुल लातूर येथे ध्वजारोहण व गोकुळाष्टमी संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील अंबेजोगाई रोड वरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर ,माऊली विद्यार्थी विकास केंद्र ,व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल , लातूर या ठिकाणी दि.१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रमुख पाहुणे मा.डॉ. श्री व्यंकट जी कोलपुके यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले सर व श्री गाडेकर सर यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहण समारंभा नंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर उत्कृष्ट अशी संगीतमय कवायत सादर केली , बालवाडी व पहिलीच्या चिमुकल्यांनी स्वातंत्र्य सेनानींच्या आठवणी हा सुंदर कार्यक्रम विविध महान क्रांतिकारकांच्या वेशभूषेत सादर केला. यामध्ये भारत माता ,झाशीची राणी महात्मा फुले ,पंडित जवाहरलाल नेहरू ,सुभाषचंद्र बोस अशा विविध भूमिका होत्या. विद्यार्थ्यांनी महान क्रांतिकारकांचे घोषवाक्य त्यांच्याच अविर्भावात म्हणून दाखवले. यानंतर क्रिडा शिक्षक श्री स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट म्युझिकल लेझीम नृत्य सादर करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये विद्यालयातील इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणा-या गुणवंतांचा सत्कारही मान्यवरांच्या हस्तेकरण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमानंतर श्रीकृष्ण जन्माष्टमी चा उत्सव ही साजरा करण्यात आला. यामध्ये प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण रासलीले वर आधारित एक सुंदर असे मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. नृत्यानंतर दहीहंडी फोडून श्रीकृष्णाची आरती व प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्याकडून विलास बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी :** विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांचे वडील आदर्श शिक्षक विश्वंभर पुरी यांचे नुकतेच निधन झाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी लातूर शहरातील अग्रेसन भवन, झिंगणआप्पा गल्ली परिसरातील विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांच्या निवासस्थानी भेट देऊन पुरी



कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला.

यावेळी वैभव पुरी, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, महेश काळे, विष्णुदास धायगुडे, बिडवे अप्पा, महेश कोळे, अभिषेक पतंगे, अभिजीत इगे आदींसह पुरी कुटुंबीय आणि मित्र परिवार उपस्थित होते.

## भारतरत्न प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळा परीसराच्या सुशोभीकरण कामाचे माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराचे शुशोभीकरण करावे अशा सूचना महानगरपालिका प्रशासनाला पत्र पाठवून केल्या होत्या. शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी लातूर शहरातील प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसराचे शुशोभीकरण कामाचे त्यांचे हस्ते शुभारंभ करण्यात आला.

प्रारंभी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश



काँग्रेसचे सचिव समद पटेल, चंद्रकांत चिकटे, अ‍ॅड. आतिश चिकटे, आसिफ बागवान, राज क्षीरसागर, प्रवीण सूर्यवंशी, तबरेज तांबोळी, अब्बू मणियार, युनूस शेख, पिराजी साठे, करीम तांबोळी, शाबास अहमद खान आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा.डॉ. बाळासाहेब चव्हाण उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्काराने सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी :**येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक डॉ. बाळासाहेब तुकाराम चव्हाण यांचा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून गौरव करण्यात आला. प्रा.डॉ. बाळासाहेब चव्हाण हे गेल्या १२ वर्षांपासून या महाविद्यालयात अनुदानित तत्वावर कार्यरत आहेत. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रा.डॉ. बाळासाहेब चव्हाण सध्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक (आयक्यूएसी को-ऑर्डीनेटर) म्हणून कार्यरत आहेत. बाळासाहेब चव्हाण हे यांनी आपले शिक्षण याच महाविद्यालयातून पूर्ण केले आहे. मूळचे लातूर तालुक्यातील कासार जवळा या गावचे रहिवाशी असलेले बाळासाहेब चव्हाण यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती तशी बेताची. मात्र,

**१२ वर्षांच्या सेवेचा गौरव; सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव**



ही परिस्थिती बदलायची असेल तर उच्च शिक्षित होऊन नौकरी मिळविणे हे त्यांच्यासमोरील मोठे आव्हान होते. त्यांनी ते आव्हान स्वीकारत जिद्दीने आणि मेहनतीने पूर्णही केले.

बाळासाहेब चव्हाण यांचे शिक्षण एम.कॉम., सेट, नेट, पीएच.डी., एम.ए. (अर्थशास्त्र), सेट झालेले आहे. सहाय्यक प्राध्यापक म्हणून २०१२ साली त्यांची दयानंद वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालयात नियुक्ती झालेली आहे. त्यांनी या १२ वर्षांच्या काळात सांस्कृतिक विभाग प्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी अशा महत्वाच्या पदांची धुरा सक्षमपणे सांभाळली आहे. त्यांच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख पदाच्या काळात दयानंद वाणिज्य महाविद्यालयाला सलग तीन वेळा जनरल चॅम्पियनशिप मिळाली आहे. सध्या ते अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थी प्रिय, कर्तव्यदक्ष प्राध्यापक म्हणून ते परिचित आहेत. दयानंद वाणिज्य महाविद्यालयास नुकताच नॅककडून ए प्लस दर्जा प्राप्त झालेला आहे, त्यातही डॉ. बाळासाहेब चव्हाण यांचे महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या विद्यार्थी पीएचडी करत आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत दयानंद शिक्षण संस्थेने त्यांचा उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून गौरव केला. रोख रक्कम १५ हजार, सन्मानचिन्ह आणि



**पुरस्कार आई-वडील यांना समर्पित !**

घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असताना आई-वडील यांनी मला शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित केले. शिक्षण घेतल्याने आज घडलो त्या मागे आई वडिलांची प्रेरणा होती. गेल्या १२ वर्षांपासून दयानंद वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. ज्या महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केले तिथेच सेवेची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. हा पुरस्कार आई समाबाई आणि वडील तुकाराम चव्हाण यांना समर्पित करतो, अशी प्रतिक्रिया डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी या अनुषंगाने बोलताना व्यक्त केली. पुरस्कार स्वीकारताना त्यांच्या पत्नी निर्मला चव्हाण यांच्यासह दोन्ही मुली उपस्थित होत्या.

स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. या पुरस्काराबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष संजय बोरा, सदस्य विशाल अग्रवाल, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्रचार्य डॉ. गणेश लहाने, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा आष्टेकर आदींनी अभिनंदन केले.

## लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा







**लातूर/प्रतिनिधी :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती वर्ष २०२५ निमित्त ''संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा'' लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ यावेळेत गंजगोलाई ते लातूर शहर महानगरपालिका, लातूर पर्यंत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा/मुर्तीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यांत आली आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने बालाजी काशिनाथ शिंदे भांडारपाल यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यांत होती. या पालखी मिरवणूक सोहळयात महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तापडे, क्षेत्रीय अधिकारी, समाधान सुर्यवंशी, बंडू किसवे, संतोष लाडलापूरे,डॉ.शंकर भारती, पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री, शिक्षणाधिकारी श्वेता नागने, वाहन विभाग प्रमुख, पवन सुरवसे, अतिक्रमण प्रमुख, रवि कांबळे, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, आस्थापना विभाग प्रमुख अभिमन्यू पाटील,अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी व जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे सर्व अधिकारी कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

पालखी सोहळयात एकूण २५ भजनी मंडळानी सहभाग घेतला असून महानगरपालिकेच्या वतीने सर्व भजनी मंडळाचे सन्मानपत्र देऊन सत्कार आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते करण्यात आला.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**

**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.**



शाखा १. जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर

शाखा २. जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर

संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली अतिवृष्टीग्रस्त भागातील पीक नुकसानीची पाहणी: शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी साधला संवाद





धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यात अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या परिस्थितीची गंभीर दखल घेत कृषी मंत्री श्री.दत्तात्रय भरणे यांनी आज जिल्ह्यातील विविध भागांचा दौरा करून शेतकऱ्यांची पीक नुकसानीच्या परिस्थितीची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.भेटीदरम्यान त्यांनी येत्या ३ दिवसांमध्ये पिकांचे पंचनामे करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारली होती.राज्यात पुन्हा एकदा मान्सून सक्रीय झाला आहे.राज्यात मुसळधार पाऊस पडत आहे.त्यामुळे अनेक जिल्ह्यांना पावसाचा फटका बसत आहे.काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसांमुळे नद्यांना पूर आले आहे. जिल्ह्यातही जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे तेरणा व मांजरा नदीला पूर आला आहे.तसेच जिल्ह्यातील काही भागातील शेतीचे नुकसान झाले आहे.

जिल्ह्यात आलेल्या अतिवृष्टीची तात्काळ दखल घेऊन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज जिल्ह्यातील विविध नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून पाहणी केली.यामध्ये प्रामुख्याने वाशी तालुक्यातील घोडकी या गावामध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली.खोंदला ता.कळंब या गावात अतिवृष्टी पुरामुळे वाहून गेलेल्या शेतकरी कुटुंबास भेट दिली. तसेच पीक नुकसानीचे पाहणी केली.वाशी शहरातील काही दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या ठिकाणीही त्यांनी पाहणी केली. दौऱ्यादरम्यान कृषी मंत्री श्री.भरणे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न, अडचणी व तातडीच्या गरजा समजून घेतल्या. शेतकऱ्यांनी शेती पिकांचे झालेले नुकसान,जनावरांसाठी चाऱ्याची कमतरता तसेच घरांचे झालेले नुकसान याबाबत माहिती दिली.

यावेळी कृषीमंत्री श्री.दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा प्रशासन,कृषी विभाग व महसूल अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे पूर्ण करून मदत कार्य गतीमान करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांना विमा हप्ता,पीक कर्ज पुनर्नियोजन,बियाणे व औषधांची उपलब्धता यासाठीही आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

श्री.भरणे यांनी पाण्यातून व चिखलातून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जात पीक नुकसानीची पाहणी करून शेतक-यांना आधार दिला.

कृषीमंत्री श्री.दत्तात्रय भरणे म्हणाले की, शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. निसर्गाच्या प्रकोपामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे,या कठीण प्रसंगी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. नुकसानभरपाई व आवश्यक मदत तातडीने केली जाईल.तसेच शेतकऱ्यांना हवामान बदलाशी लढा देण्यासाठी पिक विमा, हवामान माहिती व पिक बदल संदर्भात मार्गदर्शन यासारख्या उपाययोजना केल्या जातील. असे त्यांनी भेटीदरम्यान उपस्थित शेतकऱ्यांना आश्वस्त केले.

शेतकऱ्यांच्या दुःखात शासन त्यांच्या पाठीशी आहे.मदत आणि दिलासा पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे, असे आश्वासन कृषीमंत्री श्री.भरणे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.

पीक नुकसानी पाहणी दरम्यान माजी आमदार राहुल मोटे,कृषी व महसूल अधिकारी उपस्थित होते. दौऱ्यादरम्यान बाधित शेतकरी बांधवांनी कृषीमंत्री श्री.भरणे यांचेशी संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या.

## यशराज पब्लिक स्कुल धाराशिव येथे ध्वजारोहण..





धाराशिव (प्रतिनिधी)-७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त यशराज पब्लिक स्कूल धाराशिव येथे सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले,प्रथमतः राष्ट्रपिता महात्मा गांधी व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, तिरंगा ध्वजाला सलामी देत राष्ट्रगीत जन गण मन आणि राज्याचे गित महाराष्ट्र माझा गायणात आले.भारत देशाचा जयघोष करीत विद्यार्थ्यांना मिठाई वाटण्यात आली.आलेल्या पाहुण्यांचे स्वागत पुष्प बुके देऊन करण्यात आले,शाळेतील आयोजित कार्यक्रमातील कवायती,सांस्कृतिक कार्यक्रम,वक्तव्य सह इतर कार्यक्रम कौतुकास्पद झाले,तर हातात काठी फिरवतांचे दृश्य कुतुहल होते.तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला,अंजली राठोड पहिली मंथन राज्यात ७ लींी जिल्हास्तरीय ५ पैकी स्पृहा कुलकर्णी मंथन १०,लींी रीर, अर्णव चव्हाण,शिवांश राठोड,स्वरा जगदाळे ३ री मंथन राज्यात ३ रा लींी दुसरा, शिवानी देडे ४ थी वर्ग मंथन राज्यात ५ वा इढड १,श्रेयस चव्हाण मंथन १० वा इढड ३ ४ वी प्रबुद्ध गायकवाड लींी३ तेजेस स्कॉलरशिप मध्ये पात्र झालेल्या रवी रानमारेचे तसेच इयत्ता १० मध्ये चांगल्या मार्कांनी पास झालेले विद्यार्थी विश्र्वांक गवळी,अभिमन्य गरड,मीनाक्षी राठोड,वैष्णवी आडे,श्रीकृष्ण रोहिदास यांचा ही सत्कार करण्यात आला, यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा जेवळीकर यांच्या कडुन जे यशराज पब्लिक स्कूल धाराशिव मध्ये शिकतील या शिष्यवृत्ती साठी पात्र धारक होतील अशा मुलांना शासनाच्या वतीने देण्यात येणा-या शिष्यवृत्ती प्रमाणे शाळेकडून शिष्यवृत्ती देण्यात येईल तसेच त्यांच्या शिक्षणासाठी मदत करण्यात येईल असे सांगण्यात आले.

शाळेतील शिक्षक वर्ग यांनी केलेले नियोजन आणि व्यवस्थापन हे शिस्तबद्ध होते,लहान विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग यांचे विशेष लक्ष असुन विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी त्यांचे प्रयत्न यशस्वी आहेत.यावेळी कार्यक्रमास श्री साई श्रद्धा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.सोमनाथ लांडगे,सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे,यशराज पब्लिक स्कूल धाराशिवचे संचालक उमाकांत जेवळीकर,शाळेच्या प्रिन्सिपॉल रेखा जेवळीकर, संचालक उमाकांत जेवळीकर, शिक्षक पल्लवी सुरवसे,मधुकर कांबळे, मेघा सलगर, प्रणिता गारद,अदिती जोशी, प्राची खर्डेकर,सुभद्रा गायकवाड, स्नेहा मॅडम, सुषमा मॅम,सुनंदा बंडगर, बालाजी गरड आणि जयवंत ओमने संचालक मंडळ,शिक्षक आणि कर्मचारी सह विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत विजय रा. ईट ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१५.०८.२०२५ रोजी १०.४५ वा. सु. आपल्या ताब्यातील कार क्र एमएच ०२ सी डब्ल्यु ७८६५ ही गोलाई चौक भुम येथे जाणारे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना भुम पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५, ३/१८०,१००/१७७, ५१/१७७, १४६/१९६ मोवाका अन्वये भुम पो. ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिवच्या युवा संशोधक डॉ.शुभम धूत यांचा पंतप्रधानांकडून गौरव



धाराशिव (जिमाका) नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित "At Home Reception' या प्रतिष्ठित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, धाराशिवचे युवा संशोधक व दोन वेळा राष्ट्रीय पुरस्कार विजेते डॉ.शुभम धूत यांच्याशी संवाद साधून त्यांच्या कार्याचा विशेष गौरव केला.

आयुर्वेद क्षेत्रात अभिनव संशोधन करणारे डॉ.धूत यांनी हिमोफिलिया या दुर्धर आजारावर जगातील पहिले आयुर्वेदिक औषध 'रक्तामृत वटी' विकसित केले आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन सर्वोच्च नेतृत्वाकडून मिळालेला हा सन्मान केवळ डॉ.धूत यांचाच नव्हे,तर संपूर्ण धाराशिव जिल्हा आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.हा गौरव भावी वैज्ञानिक संशोधन व प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरेल.

## नरमादी धबधबा ओसंडला, ७० फुटांवरून कोसळतेय जलधारा, सौंदर्य खुलले; पर्यटक, संशोधकांची गर्दी

नळदुर्ग(प्रतिनिधी)-येथील बोरी धरणाच्या पाण्यात वाढ झाली असून अतिरिक्त पाणी सांडव्याद्वारे बोरी नदीतून भुईकोट किल्ल्यातील पाणी महालात येत असून नर-मादी धबधबा स्वातंत्र्यांच्या पूर्वदिनापासून गुरुवार (दि.१४) प्रवाहित झाला आहे. ७० फुटांवरून कोसळणाऱ्या या धबधब्याचे विहंगम दृश्य डोळ्यात साठवण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे. स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या येथील ऐतिहासिक किल्ला १३५१ ते १४८० दरम्यान बहमनी काळात उभारला आहे. लगतच्या बोरी नदीवर बंधारा बांधून पाणी महाल बांधला आहे. महालाला दोन बाजुंनी सांडवे सोडले असून तेच नरमादी धबधबे आहेत. इब्राहिम आदिलशहा दुसरा यांनी इसवी सन १६१३ मध्ये बोरी नदीचे पाणी किल्ल्यात वळवून त्यावर बांध घालत ५५० फूट लांब, ५० फूट रुंद व ७० फूट उंच पाणी महाल उभारला आहे.

किल्ल्याच्या उत्तरेकडून वाहत येणाऱ्या बोरी नदीचे पाणी किल्ल्यात वळवून या प्रवाहाला चंद्रकोरीचा आकार देत ते पुन्हा उत्तरेकडे वळवले आहे. वरील बाजुला असलेले बोरी धरण ओव्हरफ्लो झाले असून अतिरिक्त पाणी सांडव्याद्वारे बोरी नदीमार्गे किल्ल्यातील पाणी महालात येऊन नर-मादी धबधबा ओसंडला आहे. श्रावणात ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याचे सौंदर्य खुलले असून त्यात नरमादी धबधबा ओसंडल्याने राज्यासह कर्नाटक, आंध्र, तेलंगणातील पर्यटक, एतिहासप्रेमी, अभ्यासक येथील निसर्ग सौंदर्याची अनुभूती घेण्यासाठी येत आहेत.


**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


### उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649